## प्रकरण पहिले

## आत्मचरित्र एक आकृतिबंध

# प्रकरण - पहिले

## आत्मचरित्र - एक आकृतिबंध --

मराठी साहित्यात कथा , कादंबरी,काव्य,नाटक असे ललित वाङ्.मय प्रकार आढळतात. त्याच प्रमाणे इतिहास, चरित्र निबंध असे काही ललितेत्तर वाङ्.मय प्रकार आहेतच. आत्मचरित्र हा वाङ्.मय प्रकार आत्मनिवेदनाला अधिक जवळचा ' स्व ' जीवनाचा तो नकळत चरित्रात्मक इतिहास, मात्र अलिकडच्या आत्मचरित्रातून ' स्व ' च्या जीवना बरोबरच तत्कालीन समाज मनाचे प्रतिबिंब ही त्यातून उमटलेले दिसते. या वाङ्.मय प्रकाराची ओळख करुन घेत असताना या वाङ्.मय प्रकाराबाबत काही विचारवंतांनी आपापली मत प्रणाली व्यक्त केली आहे.

## आत्मचरित्राची व्याख्या --

आत्मचरित्र म्हणजे स्वत: लेखकाने आपल्या जीवनाची सांगितलेली कहाणी . " A biography or narrative of one's life written by oneself - "[1]

खरे पाहता आत्मचरित्र म्हणजे मूल्यगर्भ दृष्टीने घेतलेल्या स्वत:च्या जीवनाचा आत्मशोध असतो. मात्र त्यासाठी आवश्यक असणाऱ्या गोष्टी बाबत डॉ.अंजली सोमण म्हणतात " सत्य कथनाशी बांधीलकी राखणे,वर्तमान काळाच्या परिमितीतून ( parameter ) भूतकाळाची मांडणी करणे स्वत: बरोबर परिचितांचे आणि सामाजिक वातावरणाचे,चित्रण करणे. तपशिला बाबत निवडीचे तत्व स्वीकारणे हे आत्मचरित्राच्या संकेत व्यूहातील महत्वाचे घटक आहेत.[२]

विशेषा म्हणजे अन्य वाङ्.मय प्रकाराप्रमाणे आत्मचरित्रात जीवन दृष्टीकोन हे त्याच्या लेखनाला एकात्मता प्राप्त करून देणारे संघटक सूत्र असते. विशेषात: आत्मचरित्र हा वाङ्.मय प्रकार व्यक्ति वाङ्.मयाच्या जवळ जाऊन बघत आहे तो ललित वाङ्.मयाचा एक प्रकार असे आपण मानू लागलो आहोत. त्यातही आत्मचरित्र म्हणजे एक संवेदनशील व्यक्ति मनाचा तो जीवन शोधच आहे. " आत्मचरित्र हा वाङ्.मय प्रकार नवनिर्मिती पेक्षा पुनर्निर्मितीकडे झुकलेला असतो. "[3] असे डॉ.उषा मा.देशमुख म्हणत असल्या तरी आत्म - चरित्रातून आत्मचरित्रकाराचे प्रकट झालेले जीवन चित्रण हे हेतुपूर्वक व जाणीव पूर्वक असले तरी त्यातील व्यक्ति ही एकच असते. त्या व्यक्तिच्या जीवनाची संवेदनाशील ती नकळत कथा असते.तो जरी एका व्यक्तित्वाचा जीवन हिशोब असला तरी न कळत त्यांच्या प्रवासांतील जीवनाची जडण-घडण, त्याला भेटलेल्या व्यक्ती, त्यांची जीवन भ्रमणे त्यांच्या स्वत:च्या आयुष्यावर झालेला परिणाम,तत्कालीन सामाजिक चालीरितींचा त्यांच्या मनावर झालेला परिणाम, कदाचित समाजा बरोबर करावा लागलेला संघर्ष याचेही पडसाद आत्मचरित्रकाराच्या जीवन शोधातून उमटत असतात. त्या दृष्टीने " आत्मचरित्र म्हणजे स्वत: लेखकाने आपल्या जीवनाची सांगितलेली कहाणी" या संदर्भात डॉ.डी.जी. नाईक यांचे विधान लक्षात घेण्या जोगे आहे." Autobiography in its simplest definition is the story of ones life written by oneself,"[4] त्याचप्रमाणे" आत्मचरित्र हे केवळ,घटनांचे निवेदन नसते तर त्याचे सिंहावलोकन असते. असे म्हटले जाते त्या संदर्भात "Autobiography The account of an individual human life written by the subject himself "[5] असे जरी असले तरी आत्मचरित्रातून केवळ व्यक्तिच्या मनाचे प्रतिबिंब उमटलेले असते असे नाही तर तो ज्या समाजात राहतो त्या समाजाचे ही प्रतिबिंब त्यात उमटलेले असते. त्या दृष्टीनेच सेफन्सी म्हणतो " " An autobiography is not only a reflection of an individual mind but also a reflection of the State

of social conciousness "[6] ` तसेच आत्मचरित्र लिहिणे म्हणजे धीटपणाने जीवनातील सत्य सांगणे होय. व्यक्तिमत्वाची सत्य बाजू सांगणे ही आत्मचरित्र लेखणा मागची सत्य भूमिका असते या संदर्भात आंद्रे मार्वा चे मत आत्मचरित्राला लागू पडते.

" That biography is a courageous search for truth its aim is the fruthful transmission of personality "[7]

प्रामाणिकता व तटस्थता --

आत्मचरित्राच्या द्वारे आत्मचरित्रकार आपली कहाणी सांगता आपल्या मन:प्रवृत्तीचे न कळत दर्शनही घडवून देतो. त्यातून त्याच्या जीवनातील सुख दु:खाचा चित्रपट तो जसा उलगडून दाखवतो तसाच आपल्या जीवनातील आलेले बरे वाईट अनुभव ही मोकळेपणाने लोकांच्यापुढे जसे सांगतो तसे तो प्रांजळपणाने लिहून ही टाकतो.

मनात आलेले बरे वाईट विचार स्पष्टपणे मांडण्यासाठी स्वत:चे दोष कबूल करण्यासाठी आत्मचरित्रकाराच्या ठिकाणी प्रामाणिकपणा असणे हे महत्वाचे आहे. त्या संदर्भात अ.म.जोशी म्हणतात

" आपणास स्मरत असलेल्या सर्व गोष्टी ज्या योगे आपले व्यक्तिमत्व स्पष्टपणे उठून दिसेल अशा पध्दतीने लोकांसमोर मांडणे हे आत्मचरित्रकाराचे कर्तव्य होय. हे कर्तव्य पार पाडावयाचे म्हणजे आत्मचरित्रकाराच्या अंगी प्रामाणिकपणा ,तटस्थवृत्ती हे दोन गुण प्रामुख्याने असले पाहिजे" या संदर्भात डॉ.सदा क-हाडे म्हणतात ` स्वत:च्या जीवनाचे दूरस्थपणाने सिंहावलोकन वृत्तीने केलेले अवलोकन आणि त्या विषयीचे प्रांजळ निवेदन म्हणजे आत्मचरित्र ` ( चरित्र आत्मचरित्र - पृ.१०१ )

आत्मचरित्रकारा जवळ असावे लागणारे गुण --

आत्मचरित्रकाराची ती भूमिका असणे आवश्यक असते.यात ही त्याचा आविष्कार प्रकट होत असतो. मात्र हा आत्माविष्कार कथा,कविता,कादंबरी

यातील आत्माविष्कारा पेक्षा तो वेगळा असतो हे नाकारुन चालत नाही. त्यासाठी स्वयंकेंद्रिता आणि आत्माविष्कार तत्परता यांची बंधने ओलांडून त्याला पुढे जावे लागते. आत्मनिष्ठा व वस्तुनिष्ठा या दोहोंच्या मध्ये समतोल ज्याला राखता येईल त्यालाच चांगले आत्मचरित्र लिहिणे शक्य आहे. कधी कधी बोधवादी भूमिका सोडून केवळ गत आयुष्याचे सिंहावलोकन करावे या भूमिकेतूनही आत्मचरित्रे लिहिली जातात त्यामुळे आत्मचरित्रातील सुखदु:खांना ,आठवणींना उजाळा मिळतो. तसे पाहता आत्मचरित्र म्हणजे त्या लेखनाचा एक प्रकारचा कबुली जबाब असतो.

` रुसोने आपल्या आत्मचरित्राला ` कबुली ` जबाब असे संबोधले आहे.

` आत्मचरित्रकाराला आत्मचरित्रातून आत्मप्रत्ययाचा तसेच पुन: प्रत्ययाचा आनंदही लाभत असतो. स्वत: शोधा बरोबर स्वत: विषयीचे प्रतिपादन ब-याच वेळेला त्यात आढळते``[9] ` आत्मचरित्रकाराने घटनांची सत्यासत्यता शास्त्र काटयावर पारखून घेऊन केवळ भागत नाही. भूतकालीन जड घटनांच्या आधारे जीवन चैतन्य उभे करु शकणारी भाषा प्रसंगाच्या आणि व्यक्तिरेखांच्या मांडणीवरील प्रभुत्व,मानवी मना सारख्या संपन्न आणि गुंतागुंतीच्या घटकांचा शोध घेण्यासाठी आवश्यक असणारी विचार शक्ती, चिंतनशिलता आत्मचरित्रकारापाशी असणे आवश्यक असते.`[10] मात्र आत्मचरित्रकाराचे लेखन म्हणजे केवळ हकीकत नसते तो स्वत:वरचा प्रबंध ही नसतो तर साहाजिकच एकरूप आणि कलात्मक अशी गतीशील लेखन प्रवृत्ती असते. त्यासाठीच आत्मचरित्रातील आत्मकथन हे देखील विशिष्ट पध्दतीने करावे, त्यात जीवनाचे चित्रण असावे, त्याची मांडणी कलात्मकतेने असावी असे असले तरी आत्मचरित्रा पाठीमागे ` स्व ` जीवनाचे विवेचन करणे हेच तत्व असते. त्याच प्रमाणे ` स्व ` जीवनाचे चित्रण करताना ` स्व ` चे इतर लोकांबरोबर आलेले संबंध, संबंधीत असलेल्या घटना ` स्व ` ने केलेले तत्कालीन समाजाचे निरीक्षण, या सर्वांचा ` स्व ` वर झालेला परिणाम या सर्वातून आत्मचरित्राला आकार येतो. वाङ्मयीन सौंदर्य प्राप्त होते अशा दृष्टीनी लिहिले गेलेले चांगले कलात्मक आत्मचरित्र नेहमीच संपूर्ण त्या काळाला, त्या काळातील भाव जीवनाला आत्मकृत

लेखासह जिवंत करीत असते. आत्मचरित्र म्हणजे तटस्थवृत्तीने केलेले प्रांजळ व निरपेक्ष आत्मनिवेदन होय.

त्यासाठी आत्मचरित्रकारा जवळ प्रांजळपणा हा गुण असला पाहिजे. त्यातील निवेदन प्रांजळ असावे. त्याच प्रमाणे आत्मचरित्रातही कलात्मक मांडणी महत्वाची असते. काय सांगावे, किती सांगावे आणि आपण कसे सांगावे याचेही भान ही आत्मचरित्रकाराला असले पाहिजे. जवळ जवळ हे सत्यकथन असते. ' कोणत्याही वाङ्.मय प्रकारापेक्षा आत्मचरित्रातील व्यक्ती ख-या खु-या वास्तवातील असतात. वास्तवातील व्यक्तिचित्र रंगविणे हे फार अवघड असते कारण सत्य दर्शनाचे अवघड बंधन त्याला स्विकारावे लागते. आपले चित्र रंगविण्यात जितका तो गुंततो तशीच इतरांची चित्रे रंगविण्यात क्वचित गुंतत असतो. ज्या ज्या प्रसंगाच्या संदर्भात, ज्या ज्या व्यक्तिशी त्यांचा संबंध आलेला असतो त्या त्या संदर्भातच त्यांच्या व्यक्तिमत्वाची वैशिष्टये प्रकट होत असतात.

या वाङ्.मय प्रकारातही स्वभाव लेखनात सर्वात अधिक महत्व असते. ते आत्मचरित्र लेखकाला कारण तोच या कथेचा नायक असतो. त्यामुळे या लिखाणात त्याच्या व्यक्तिमत्वाचे चित्र अधिक अंगाने येणे स्वाभाविक आहे. आत्मचरित्रामागे आत्माविष्काराची प्रेरणा आत्मजीवनाच्या अर्थपूर्णतेची अर्थता, स्वानुभावांच्या निवडीची दृष्टी, ' स्व ' शैली विधायक भान अशा गोष्टी प्रेरक असतात शिवाय ऐतिहासिक साहित्यकृति प्रमाणे विशीष्टतेकडून सामजस्याकडे जाण्याची क्षमता असते. आत्मचरित्र ललित गद्य प्रकार मानला जावा असे रा.ग.जाधव यांना वाटते. ' मूल्यगर्भ दृष्टीने घेतलेला आत्मशोध ही पायाभूत गरज असते या शिवाय सत्य - कथनाशी बांधिलकी राखणे, वर्तमानकालाच्या परिमितीतून सामाजिक वातावरणाचे चित्रण करणे, तपशिलाबाबत निवडीचे तत्व स्वीकारणे हे आत्मचरित्राच्या संकेत व्यूहातील महत्वाचे घटक आहेत. ' [११]

" मोकळेपणामुळे या लेखन प्रकाराला पुष्कळदा मुक्तद्वाराची कळा येते. आत्मपरता आणि आत्मनिरपेक्षता, व्यक्तिनिष्ठा व समूह शीलता, तादात्म्य

आणि ताटस्थ्य, संश्लेषण आणि विश्लेषण यांचा तोल नेमकेपणे आणि नेटकेपणे सांभाळावा जावा लागतो.' [१२]

आपल्या साऱ्या स्मृतिरूप अनुभवांना सजीव करून त्यांची सांदणारी प्रतीती घेणे, त्यांचा आकार जाणिवेत उमटविणे, त्यांच्याकडे वेगळ्या कुतूहलाने आणि म्हणूनच तटस्थपणे पाहणे, आपल्या अनुभवांना संकेतरूप देऊन स्वतंत्र अस्तित्व प्राप्त करून देणे, अशा रीतीने त्यांना अजर आणि अमर करणे ' [१३] हा आत्मचरित्राचा लेखन हेतू गंगाधर गाडगीळ यानी स्पष्ट केला आहे.

जिज्ञासा हा माणसाचा जन्मदत्त स्वभावगुण आहे. दुसऱ्याचे जीवन जाणून घेण्याची त्याला नेहमीच उत्सुकता असते. व्यक्तिचे जीवन दर्शन घडविणे हे आत्मचरित्राचे प्रमुख उद्दिष्ट आहे. त्यामुळे जिज्ञासावृत्तीचे समाधान या वाङ्मय प्रकाराकडून पुरेपुर मिळू शकते. आणि या कारणाने मानवी मने आत्मचरित्राकडे आपोआप आकर्षिली जातात. या दृष्टीने आपल्याकडे पुरुषांनी लिहिलेली आत्मचरित्रे त्यामध्ये गंगाधर शास्त्री पटवर्धन तसेच विष्णू बुवा ब्रह्मचारी ' वेदोक्त ' धर्म प्रकाश ( १८५९ ) वासुदेव बळवंत फडके यांचे आत्मचरित्र १८७९ मध्ये ज्ञान प्रकाश मधून प्रकाशित झाले.

अर्वाचीन मराठी साहित्यात दादोबा पांडुरंगांचे आत्मचरित्र हा पहिला आत्मचरित्रपर ग्रंथ मानला जातो, त्यानंतर १८८७ मधील बाबा पद्मनजींचे ' अरुणोदय ' , वि.दा.सावरकरानी केलेले जोसेफ मॅझिनीचे केलेले आत्मचरित्राचे भाषांतर अशी काही आढळतात. त्याचप्रमाणे स्त्रियांनीही आत्मचरित्रे लिहिलेली आहेत. अलिकडेच म्हणजे १९९२ मध्ये आनंदीबाई शिर्के यांची जन्मशताब्दी साजरी झाली. त्यांच्या ' सांजवात ' या आत्मचरित्राचा सामाजिक मूल्यांच्या दृष्टीने व वाङ्मयीन गुणवत्तेच्या दृष्टीने या प्रबंधिकेतून शोध आणि बोध घ्यावयाचा आहे.

# संदर्भ


१) Webster p.140
New International Dictionary, 2nd Ed.,
Vol.1, Newyork, 1960.

२) डॉ.अंजली सोमण
'साहित्य आणि सामाजिक संदर्भ'
प्रतिमा प्रकाशन (५१) १३५९ पृ.१२१
सदाशिवपेठ पूणे, ४११०३०
प्रथम आवृत्ती १९८९.

३) डॉ.उषा मा.देशमुख पृ.१८
'दीपमाळ' ज्ञानेश प्रकाशन &
नवनिर्माण प्रतापनगर,
नागपूर ४४० ०२२

४) Dr.D.G.Naik, पृ.११
" Art of Autobiography '
Vidrabha Marathwada book Company,
Poona , 1962.

५) Encyclopaedia Britannica Vol.2,
William Benton पृ.८५४
London, 1968.

६) सेफेन्सी पृ.२३०
Biography and Society, Edit-Daniel
Bertaux Sponsored by the International
Sociological Association I.S.A.1981.

७) Andra Maurois, पृ.७१
"Aspects of Biography "
(C.U.P.) 1929.

८) अ.म.जोशी — पृ.१०४
`चरित्र आणि आत्मचरित्र`
सुविचार प्रकाशन, पुणे
दुसरी आवृत्ती, १९६६

९) गो.म.कुलकर्णी — पृ.१२०
`वाटा आणि वळणे`
नव साहित्य प्रकाशन
प्रथम आवृत्ती, २६ जानेवारी १९७७
रमादेवी रस्ता ( बेळगांव )

१०) तत्रैव — पृ.१२१

११) गो.म.कुलकर्णी — पृ.१२१
`वाटा आणि वळणे`
नवसाहित्य प्रकाशन
प्र.आ. २६ जानेवारी १९७७
रमादेवी रस्ता ( बेळगांव )

१२) तत्रैव — पृ.१४१

१३) गंगाधर गाडगीळ — पृ.६८-६९
साहित्याचे मानदंड`
पाप्युलर प्रकाशन,
प्र.आ. १९६२.